# ईश्वरदत्त देणगी

**श्वा**न हे कमी बुध्दीचे, आपण माणसे बुध्दिमान, आपण वाट्टेल ते काम करू शकतो अशा गोड गैरसमजुतीत श्वानाभोवतीची माणसे वावरत असतात. पण तसे नसते. श्वान जगतात वावरत असताना आपल्या काही चुका होतात आणि आपल्या या समजुतीला धक्का बसतो. अशा काही होणाऱ्या चुकांबद्दल माहिती देण्याचा या प्रकरणात माझा प्रयत्न आहे.

कोणत्याही प्राण्याची बुध्दी जेवढी कमी, तेवढी त्यांना मिळालेली ईश्वरदत्त देणगी अधिक असते. कोणत्या प्राण्याची कोणती शक्ती मोठी आहे हे लक्षात घेऊन त्या त्या प्राण्याचा आपल्या समृध्दीसाठी उपयोग करून घेणे हाच आपल्या बुध्दीचा खरा उपयोग आहे.

श्वानाचे नाक व कान ही दोन ज्ञानेंद्रिये माणसाहून अधिक क्षमतेची असतात हे तुम्हाला माहीत असेलच. पण श्वानाच्या मनकवडेपणाची जाणीव आपल्याला फारशी नसते. इतरांच्या मनात चाललेले विचार जाणून घेण्याच्या श्वानाच्या शक्तीची जाणीव श्वान शिक्षकांनी व पालकांनी सतत आपल्या मनात ठेवायला हवी. श्वानाबरोबर वावरताना आपल्या मनोव्यापाराबाबत आपण जागृत असायला हवे. त्याचबरोबर श्वानाचाही त्याच्या पालक व शिक्षकांवर परिणाम होतो हे लक्षात घ्यायला हवे. श्वान विश्वात वावरताना डोळे उघडे ठेवून भोवतालची माणसे पाहण्याची सवय मला लागली. श्वान ज्या क्षेत्रात वाकबगार असतात व ज्या क्षेत्रात वापरले जातात, त्या क्षेत्रात श्वानांपेक्षा जास्त कुशाग्र बुध्दिमत्तेची माणसे मला दिसली. श्वानांपेक्षा जास्त कार्यक्षमतेच्या माणसांचे नमुने पोलीस दलात काम करणाऱ्या माणसांत मला दिसले. या संबंधात लिहायचे  तर बॉंब शोधक पथकातील एक माणूस मी आयुष्यात विसरणार नाही.

त्या दिवशी मी महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील ‘बॉंब शोधक’ श्वानांची चाचणी घेत होतो. मी काय करतो आहे हे कोणाला दिसू नये म्हणून मी परीक्षा घेणार होतो त्या जागेभोवती किन्तान लावून घेतले. पोलिसांचा एक माणूस बॉंब पेरण्यासाठी लागणारे खड्डे खोदण्यासाठी वापरला. त्याला बाहेर काढले. मग मी काही खड्डे नुसते बुजवले. त्यानंतर काही खड्ड्यांत रुमाल ठेवले आणि ते बुजवले.त्यानंतर काही पिशव्यांत वाळू घातली व त्या पिशव्या खड्ड्यात घालून ते खड्डे बुजवले. त्यानंतर मी पिशव्यांत स्फोटके घातली व त्या पिशव्या  खड्ड्यांत घालून ते बुजवले. खड्डा कोठे होता ते वरून कळणारही नाही अशी जमीन सारखी केली. जमीनीत पेरलेली स्फोटके शोधण्यासाठी किमान काही वेळ द्यावा म्हणून हे काम करून मी जेवायला गेलो. पोलीस पथकाला त्या जागेभोवतीचे पडदे काढायला सांगितले. म्हणजे परीक्षार्थी व इतरांनी तेथे वावरावे म्हणजे अनेक प्रकारचे वास तेथे राहतील असा माझा हेतू होता.

दुपारी साडेतीन चारच्या सुमारास मी श्वानांची परीक्षा घ्यायला सुरुवात केली. बरेच श्वान होते. तपासणी संध्याकाळपर्यंत चालली होती. चाचण्यांचे निकाल लिहून क्रमवारी लावायला अंधार पडला.  काम संपविताना स्फोटके विभागाचा हवालदार आला. तो म्हणाला, “साहेब,स्फोटके काढून द्या.“ मी म्हटले, “सकाळी देतो.” तो विचित्र हसला. म्हणाला, “ती स्फोटके गायब झाली किंवा चोरीला गेली तर तुमच्याबरोबर माझीही चौकशी होईल. अटक होईल.”  मी माझ्याबरोबरच्या पोलीस अधिकाऱ्याकडे पाहिले. तो म्हणाला, “साहेब,परीक्षक म्हणून या सर्व प्रकाराला तुम्ही जबाबदार आहात. स्फोटके काढून द्यायला हवीत.” एव्हाना मी सर्व श्वान व त्यांची माणसे यांना तेथून केंद्रात पिटाळले होते. ते कोठे गेले असतील ते पाहणे अशक्य होते.

अशा कठीण प्रसंगी एक ‘माणूस’ म्हणाला, “साहेब,मी काढून देतो.” तो माणूस प्रत्येक रिंगणाजवळ गेला. रिंगण ओलांडताना तो सांगायचा, ‘इथे काहीही नाही’,किंवा ‘इथे काहीतरी आहे, पण काय ते सांगता येत नाही,’ तेथे माझे रुमाल होते. ‘साहेब,येथे काहीतरी जरूर आहे, ‘ असे त्याने सांगितले तेव्हा तेथे वाळू भरलेल्या पिशव्या

होत्या. असे करत करत त्या माणसाने तेथे असलेली सर्वच्या सर्व स्फोटके काढून दिली. माझ्या आश्चर्याला पार राहिला नाही. मी त्याला स्पष्टच विचारले, “अहो,आपण हे कसे करता?” त्यावर तो म्हणाला, “साहेब,मी स्फोटक शोधक शाखेत हवालदार आहे. श्वान पोहोचण्याआधी तेथे आम्ही पोहोचतो व जागा डोळ्याखालून घालतो. जिवाला धोका असतो. साहेब,कसं होतं ते समजत नाही, पण स्फोटकं असली की आम्हाला समजतं,” तो माणूस जे सांगतो त्यावर कदाचित कोणाचा विश्वास बसणार नाही, पण त्याने आधी केले आणि मग सांगितले असल्याने मी त्याला मनोमन नमस्कार केला.

माणसांत असलेल्या अशा तीक्ष्ण झालेल्या सुप्त शक्तीचे नमुने मी खूप पाहिले आहेत. अशी माणसे जेव्हा श्वान शिक्षक म्हणून काम करतात तेव्हा मोठा घोटाळा होतो. श्वानाचा मनकवडेपणा तेथे आड येतो. श्वान त्याच्या शिक्षकाला देव मानत असतो. त्याला खूष ठेवण्यासाठी शिक्षकाच्या मनात काय चालले आहे ते जाणून त्याप्रमाणे श्वान वागत असतो. श्वानाच्या अशा वागण्याचे प्रत्यक्ष उदाहरण अगदी पहिल्या धड्यात त्याच्याबरोबर चालण्यात दिसून येते. आपण केव्हा चालणार, केव्हा वळणार हे श्वानाला आपल्या विचारातून समजते. आपण काहीही हुकूम दिला नाही तरी श्वान आपल्या सावलीसारखा आपल्याबरोबर राहतो. तुम्ही वेग वाढवा, श्वानाचे पाऊल तुमच्या पावलाबरोबर वेगाने पडते. तुम्ही धीरे कदम चाला, त्याच्या पावलांची गती कमी झालेली जाणवेल.

अशीच एक सत्य घटना. गुन्हा झाल्यावर तीन दिवसांनी गुन्ह्याच्या जागी पोलीस श्वान घेऊन गेले. खरे तर तोपर्यंत कुत्र्याला माग काढण्यासाठी लागणारा वास नाहीसा झालेला असतो. पण तरी त्या कुत्र्याने त्या गुन्ह्याचा माग काढला. मग ते कसे काय झाले? त्याचे असे झाले की कुत्रा प्रत्यक्षात गुन्ह्याच्या जागेपासून फार पुढे जाऊ शकला नाही, तेथेच घुटमळला. पण कुत्रा आणला म्हटल्यावर तेथे गर्दी जमली. कुत्रा पुढे जात नाही हे पाहून त्या घरात रोज येणाऱ्या दूधवाल्याचा जीव भांड्यात पडल्यासारखा भाव त्याच्या चेहऱ्यावर दिसला. तो त्या कुत्र्याला हाताळणाऱ्या पोलिसाने पाहिला. त्याच्या मनात संशय आला. ते जाणून त्या कुत्र्याने त्या दूधवाल्याचा माग काढला. कुत्रा थेट त्या दूधवाल्याकडे गेला. पोलिसांनी त्या दूधवाल्याला ताब्यात घेतले. प्रश्न विचारले. त्या दूधवाल्याने चोरीचा गुन्हा कबूल केला. अशाही पध्दतीने गुन्ह्याचा तपास लागू शकतो. पण त्यात त्या कुत्र्याची हुशारी नसून त्या कुत्र्याला हाताळणाऱ्या पोलिसाची हुशारी असते. म्हणून कुत्रा शिकविताना त्याला स्वतंत्रपणे माग काढण्याचे शिक्षण दिले पाहिजे. त्याला प्रशिक्षकाच्या मनाप्रमाणे माग काढण्याची सवय लागणार नाही याची खबरदारी घ्यायला हवी.

श्वानाचा हा मनकवडेपणा त्याच्या कामात काही वेळा कसा घातक ठरु शकतो त्याचे एक उदाहरण मी येथे देतो. सेंद्रीय शेतीचा एक चार पाच माणसांचा एक अभ्यासगट घेऊन मी दौऱ्यावर गेलो होतो. त्या गटात वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या बुध्दिमान व्यक्ती होत्या. त्यात पुण्याचे प्रसिध्द डॉ.राजीव शारंगपाणी होते. त्यांचे एक मित्र डॉ.वझे होते. पुण्याचे बांधकाम व्यावसायिक इंजीनियर विनीत श्रोत्री होते. व्यापारी कंपन्यांसाठी विक्री वाढविण्यास मदत करणारे जाहिरात क्षेत्रातील श्री.महेश गजेंद्रगडकर होते. एका धंदेवाईक श्वान शिक्षकाची शाळा पाहण्यास मी त्यांना घेऊन गेलो. आधी सांगितले असल्याने त्यांनी जय्यत तयारी करुन ठेवली होती. मैदानावर खुंटे गाडून त्याला श्वान बांधून ठेवलेले होते. त्यांना बसायला त्यांची आसने होती. एक श्वान त्यांच्या बंगल्याच्या आवारात मोकळा होता, तर एक दोन आवारात बांधलेले होते. गाडीतून उतरताच मी सरळ श्वानांकडे गेलो. प्रत्येकाचे लक्ष वेधून घेऊन कोण श्वान किती पाण्यात आहे, तो किती शिकलेला आहे त्याचा अंदाज घेतला. माझ्याही मनातील विचार बदलले.

त्या गृहस्थांनी आम्हाला प्रात्यक्षिके दाखविली. सर्वांनी त्यांचे मनापासून कौतुक केले. प्रात्यक्षिके झाल्यावर मी त्या गृहस्थांना म्हटले, “तुमच्या काही चुका होत आहेत, सर्वांसमोर सांगितल्या तर चालतील का?” त्यावर ते गृहस्थ हो म्हणाले. तुमच्याकडून काही शिकायला मिळेल म्हणूनच तुम्हाला बोलावले असेही म्हणाले. तरीही थोडे दुखावले गेलेले मला दिसले. मी त्यांना सांगितले, तुमचे श्वान तुमच्या मनातील इच्छेप्रमाणे काम करीत आहेत. ते

स्वतःचे असे कसब वाढवत नाहीत. त्याचे उदाहरण म्हणून मी त्यांना दोन गोष्टी करून दाखविल्या. त्यापूर्वी त्यांनी केलेल्या प्रात्यक्षिकात त्याच गोष्टी दाखवून त्यांनी सर्वांची वाहवा मिळविली होती. एक होते फुड रिफ्युजल. इतरांनी दिलेले खाणे न घेणे. दुसरी होती फुटबॉलच्या मैदानाएवढ्या मोठ्या मैदानातून लपवून ठेवलेली एक आगपेटीतील काडी शोधून काढणे. मी त्यांना त्यांच्या घरात बसायला सांगितले. त्यांची दोन माणसे घेतली. पाच सात मिनिटे त्यांनी आमच्याबरोबर त्यांचे प्रशिक्षित श्वान फिरविले. त्या श्वानांनी आमच्यापैकी कोणीही दिलेली बिस्किटे आनंदाने खाल्ली. काही वेळापूर्वी याच श्वानांनी त्यांच्या तोंडात कोंबलेले बिस्कीटही खाली टाकले होते. ती प्रात्यक्षिके पाहणारी माणसे बुध्दिवान असली तरी श्वानशिक्षणात गती असलेली नव्हती. त्यामुळे त्यांना या खाचाखोचा समजल्या नव्हत्या.

'ड्रॉप' म्हणजे आपण तोंडात धरलेली वस्तू खाली टाकायची हाच धडा गिरविलेले ते श्वान प्रात्यक्षिकाच्या वेळी खाणे खाली टाकत होते कारण ते श्वानशिक्षक मनातल्या मनात त्यांना 'ड्रॉप', 'नो'असे हुकूम करून वस्तू टाकायला व पुन्हा त्यांचे मन बघायला सांगत होते. श्वानांना शिकविताना हुकूम देणे केव्हा तरी बंद करावे लागते. शिकविलेली गोष्ट श्वानाच्या अंगी सवय म्हणून बाणावी लागते. हे त्या श्वानशिक्षकाच्या लक्षात आलेले नव्हते. आम्ही शिकविलेले सर्व तुमचा श्वान करतो हे आम्ही तुमच्या समोर दाखविले होते, पण त्याला घरी नेल्यावर तो सराव तुम्ही ठेवला नाहीत तर ते श्वान काम करीत नाहीत, असे सांगताना हा श्वानशिक्षक स्वतःचीच फसवणूक करून घेत होता. त्याचे श्वान त्याच्या इच्छेनुसार काम करतात. अंगी सवय बाणवणे दूरच, पण स्वतःचे मनःसामर्थ्य वा निर्णयशक्ती वापरत नाहीत कारण त्यांना तशी संधी न मिळाल्याने तशी सवय त्यांना लागली नव्हती.

त्यांच्या दृष्टीआड त्यांच्याच माणसांनी लपविलेली आगपेटीची काडी त्यांना शोधता आली नाही. ज्या मार्गावरून त्यांचा काडी लपविणारा माणूस परत आलेला त्यांनी पाहिला होता त्याच दिशेने जेथे जेथे झुडपे होती तेथे काडी लपविली असेल असे त्यांना वाटत होते. त्याच ठिकाणी तो श्वान गेला. श्वान माणसाच्या विचारप्रवाहामागे जातात, ही चर्चा त्या श्वानशिक्षकाशी आधीच झालेली असल्याने श्वान जेव्हा त्याच्या मनातील जागी जाऊ लागला तेव्हा ते त्याच्या ताबडतोब लक्षात आले व ते त्यांनी लगेच मान्य केले.

आणखी एक अनुभव. मी पोलीस श्वानांची परीक्षा घेत होतो. ज्याची परीक्षा घ्यायची त्याचा प्रशिक्षक माझ्यासमोर होता. त्याच्या समोर मी स्फोटकाने भरलेली पिशवी ठेवली. तो येण्याआधी एका खड्ड्यात मी स्फोटकासह एक पिशवी ठेवली होती. श्वानाने समोरच्या पिशवीत स्फोटके असल्याचे दाखविले. मी त्याला नापास केले. त्याच्या प्रशिक्षकाला आश्चर्य वाटले. रागही आला. त्याचे श्वान का पास झाले नाही हे त्याला जाणून घ्यायचे होते. मी त्याला समजावून सांगितले की स्फोटके असलेली पिशवी खड्ड्यात होती. स्फोटकांचा वास असलेली पिशवी समोरच होती. त्यामुळे ती पिशवी पाहून प्रशिक्षकाला वाटले, त्याच पिशवीत स्फोटके असतील. परिणामी तीच पिशवी श्वानानेही स्फोटकांची म्हणून दाखविली होती.

पोलीस दलातही याच चुका होतात. श्वानशिक्षक स्वतः वस्तू लपवितो किंवा लपवीत असताना बघत असतो. त्या वस्तूचा माग काढताना श्वानाला नकळत मार्गदर्शन करीत राहातो. त्यामुळे त्यांचे श्वान स्वतः काम करण्याऐवजी त्यांना हाताळणाऱ्यांच्या इच्छेप्रमाणे काम करू लागतात. अनेक श्वानांना स्वतःचे डोके वापरण्याचे शिक्षण झालेलेच नसते असे नाइलाजाने म्हणावे लागेल. तुम्ही श्वानशिक्षक असाल किंवा मालक-पालक असाल तर याबाबत खबरदारी जरूर घ्या. शिक्षणात स्वतःची वा इतरांची फसवणूक कळत न कळत झाली तर ती एकवेळ क्षम्य असते, पण मी श्वानाबरोबर नेहमी असतो, बाहेरून येणारा तज्ज्ञ सांगतो ते ऐकण्याची गरज नाही, मला माझा श्वान इतर कोणापेक्षाही जास्त कळलेला आहे हा समज होणे धोकादायक आहे.